झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा./तांत्रिक ३ / ९३५ /२०२३
दिनांक : १६ /०१/२०२३

# झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र-अंतिम योजना

(विशेष नियमावली, २०१४ मधील नियम क्र. एस. आर. ४(५) अन्वये योजनेस प्रशासकीय मान्यता)

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

प्रस्तावना :

१. मौजे पिंपरी येथील स.नं. १०३ पै., सि.स.नं. ६४२६ पै.६४२७,६४२८,६४२९ पै. ६४६२, ६४६२/१, येथील आंबेडकर नगर, नेहरू नगर, झोपडपट्टी संदर्भात २२३७.१० चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे.ओम साई कन्स्ट्रक्शन यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि. १५/०२/२०१३ रोजी प्रस्ताव दाखल करणेत आला आहे. दि.२३/०४/२०१८ रोजीचे सक्षम प्राधिकारी यांनी पात्रतेसंदर्भात तयार केलेल्या परिशिष्ट-२ नुसार सदर झोपडपट्टीतील ९२.७० टक्के झोपडीधारकांच्या संमतीसह प्रस्ताव दाखल करणेत आला आहे.

२. सदर प्रकरणी महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निमूर्लन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ नुसार खालीलप्रमाणे विहित कार्यवाही पार पाडली आहे.

अ) उक्त अधिनियमाचे कलम ३क अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र आदेश जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/आंबेडकर नगर/१४६२/२०१७ दि. २४/११/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत.

आ) उक्त अधिनियमाचे कलम ३ड अन्वये झोपडपट्टी निमूर्लन आदेश जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/झोनिआ/१४०८/२०२१ दि. २२/११/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहेत.

इ) झोपडीधारकांची दि.२३/०४/२०१८ रोजीची सक्षम प्राधिकारी यानी प्रमाणीत केलेली अंतिम पात्रता यादी परिशिष्ट - २ दि २३/०४/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.व दि. ३०/०३/२०२१ रोजीची सक्षम प्राधिकारी यांनी पुरवणी पात्रता यादी कायम करणेत आलेली आहे.

३. सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत या कार्यालयात दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावास अनुसरून या प्राधिकरणामार्फत दि.०८/१२/२०२२ रोजी उक्त नियमावलीतील नियम क्र. ४(३) अन्वये "झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र प्रारुप योजना" सदर मिळकतीवरील झोपडीधारकांना दिनांक ०९/१२/२०२२ रोजी उपलब्ध

करून देण्यात आली आहे. प्रारूप योजने संदर्भात प्राप्त हरकती संदर्भातील स्थिती खालीलप्रमाणे आहे.

सदर प्रकरणी प्राधिकरणाकडे सदर प्रारूप योजनेबाबत एकूण ०१ लेखी हरकत प्राप्त झाली. सदर हरकतीचा विचार करण्यात आला व प्राप्त हरकतीची या कार्यालयाकडे सुनावणी घेणेत आल्यानंतर दिनांक ०६/०१/२०२३ रोजी प्राप्त हरकत फेटाळण्यात आली. त्याबाबतची कारणमिमांसा नमूद करून आदेश पारित केले असून संबंधिताना प्रती पाठविण्यात आले आहेत व त्याबाबतचे स्वतंत्र अभिलेख प्राधिकरणाच्या कार्यालयात उपलब्ध ठेवण्यात आले आहेत.

४. सदर प्रारुप योजनेसंदर्भात सर्व संबंधितांचे म्हणणे व दाखल असलेली कागदपत्रे आणि पुरावे विचारात घेऊन या प्राधिकरणामार्फ़त दि. १६/०१/२०२३ रोजी सदर क्षेत्रासंबंधीत उपलब्ध केलेल्या प्रारूप योजनेस उक्त नियमावलीतील नियम क्र. एस.आर. ४(५) अन्वये मान्यता देण्यात येत आहे. प्रारुप योजनेमध्ये नमूद बाबीं व्यतिरिक्त खालील बाबी समाविष्ट करण्यास/ बदल करण्यास अनुमती देण्यात येत आहे.

अ) सदर प्रारूप योजनेमध्ये नजरचुकीने मिळकतीच्या वर्णनात नमूद झालेला सि.स.नं. ६२६२/१ ऐवजी सि.स.नं. ६४६२/१ असा बदल करणेत येत आहे.

सदर प्रकरणी दि.१६/०१/२०२३ रोजी मंजूर केलेल्या योजनेमधील सर्व बाबींची अंमलबजवाणी करणे सर्व संबधीतांवर बंधनकारक राहील

५. या प्रकरणी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देणेसंदर्भात आदेश स्वतंत्रपणे पारित करण्यात येतील. सदरच्या अंतिम योजनेमध्ये प्रसंगानुरूप आवश्यक असल्यास बदल करण्यात येतील.

६. सदर योजनेद्वारे विकसक **मे.ओम साई कन्स्ट्रक्शन** यांना सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता या प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून विकसक यांनी उक्त अधिनियमातील व उक्त नियमावलीतील तरतूदीस अधिन राहून सदर योजनेची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित असलेले व्यवस्थापन व होणारा सर्व खर्च करणेची संपूर्ण जबाबदारी विकसकाची आहे.

७. सदर योजनेचे विकसक **मे.ओम साई कन्स्ट्रक्शन** यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरू करणे, बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील व या संदर्भातील शासनाने तसेच प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे अनुपालन करणे विकसक यांच्यावर बंधनकारक राहील.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

सदरची अंतिम योजना ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह जारी करण्यात आली असून प्रस्तुतची योजना सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील, याची नोंद घ्यावी.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- १६/०१/२०२३

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

16.1.23
नीलेश गटणे भा.प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

o/c

प्रत माहितीस्तव :

१. मा. आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे.
२. झोपुप्रा पुणे कार्यालयातील विभाग
   - सक्षम प्राधिकारी क्र.३
   -सहा.निबंधक सहकारी संस्था - सदर प्रकरणी सहकारी संस्था नोंदणी प्रक्रिया चालू करावी.
   -संगणक शाखा - सदर आदेशास संकेत स्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.
३. विकसक तथा जमीन भोगवटादार - मे. ओम साई कन्स्ट्रक्शन
   स.नं. ८९/१, चंद्ररंग ग्रुप, जे.आर.डी.टाटा उड्डाण पुला जवळ, पिंपळे गुरव, पुणे - ६१.
४. मौजे पिंपरी स.नं. १०३ पै., सि.स.नं. ६४२६ पै.ते ६४२९ पै. ६४६२, ६४६२/१, (आंबेडकर नगर, नेहरूनगर, झोपडपट्टी) येथील झोपडपट्टीधारकांकरीता माहितीसाठी संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येत आहे.